१४) अर्जदाराने विहित इमारत विषयक विनियमांचे आणि प्रादेशिक विकास (रिबन डेव्हलपमेन्ट) प्रतिबंधक नियमाचे अनुपालन केले आहे.

१५) या जमिनिमध्ये सुविधाधिकार वै इतर अधिकारी आहेत आणि असे अधिकार असणाऱ्या व्यक्तींची कृषीतर प्रयोजनार्थ मंजुरी देण्यास कोणतीही हरकत नाही.

१६) अर्जदाराने गौण खनिज निष्कर्षण नियमानुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून खाणकाम दगडखाणीकाम करण्याबाबतचा भाडेपट्टा किंवा परवाना घेतलेला आहे.

१७) ज्या शर्तीस अधिन ठेवून कृषीत्तर प्रयोजनात परवानगी देण्यात येणार आहे त्या शर्तींचे अनुपालन करण्यास अर्जदाराने संमती दिली आहे. सोबत अर्जाबाबत संबंधित अधिकाऱ्यांचे अभिप्राय प्रति जोडल्या आहेत.

१८टिप :- वर निर्देशिलेल्या प्राधिकाऱ्यांनी, सशर्त "ना हरकत" प्रमाणपत्रे दिली असतील किंवा आदेशामध्ये विशिष्ट अशा शर्ती सुचवल्या असतील तर अशा शर्ती या आदेशाच्या खालील परिच्छेद ३ मध्ये नमुद करण्यात येतील.

वरिल मुद्दे लक्षात घेता या प्रकरणातील अर्जदाराने आपल्या अर्जान्वये कृषीतर प्रयोजनासाठी मागितलेली परवानगी देण्यास कोणतीही हरकत नाही असे वाटते.

महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ यांच्या कलम ४४ अनुसार विहित केलेल्या शक्तीचा वापर करुन औरंगाबादचे जिल्हाधीकारी श्री रामराव केशवराव मुख्य प्रवर्तक कल्पतरु स. गृ. निर्माण स. गारखेडा तालुका औरंगाबाद यांना पुढिल शर्तीस अधिन ठेवून तालुका अधील गारखेडा सं.न.१५/१/अ येथील भुमापन क्रमांक/गटक्रमांक सीटीसर्वे क्रमांक ~~एफ पी क्रमांक~~ या मधील १ एकर ३२ (१५२००) चौ.मि. क्षेत्रफळांच्या जमिनिचा वापर (निवास) (निवासी उपयोगासाठी) कृषीतर प्रयोजनासाठी करण्यास मंजुरी देत आहे.

१) ही परवानगी संहितेच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींस अधीन असेल.

२) अशी परवानगी मिळालेली व्यक्ती अशी जमिन ज्या प्रयोजनासाठी वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे त्याच प्रयोजनासाठी, त्या जमिनिचा तीवरील इमारतीसह आणि किंवा बांधकामासह वापर करील, आणि औरंगाबाद ह्या जिल्हाधीकाऱ्यांच्या ~~उप विभागीय अधिकाऱ्याची / तहसिलदाराची~~ तशा अर्थाची लेखी पुर्व परवानगी मिळाल्या खेरीज अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी, अशा जमिनिचा किंवा तिच्या एखादया भागाचा किंवा तीवरील इमारतीचा वापर करणार नाही या प्रयोजनासाठी ~~उप~~ विषयक एखादया भागाचा किंवा तीवरील इमारतीचा वापर करणार नाही या प्रयोजनासाठी इमारतीचा महसुल अधिनियमाचे ... ठोस.

अ ग ग - १
(३००८ २७ ४५)
२०२१

Seal of the Sub Registrar Aurangabad No.1

४ (11) ९

३ उक्त परवानगी देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडून पूर्व संमती मिळाल्याखेरीज संबंधीत व्यक्ती या आदेशामध्ये मान्यता दिलेल्या प्लॉटचे किंवा सब प्लॉटचे विभाजन करणार नाही.

४) परवानगी मिळालेली व्यक्ती, अशी जमिन काटेकोरपणे मंजुर करण्यात आलेल्या नकाशावर हुकुम या आदेशाच्या दिनांकापासुन एक वर्षाच्या कालावधीत (अ) जिल्हाधीकारी आणि संबंधीत नगर पालिका प्राधिकारी यांची खात्री होईल अशा प्रकारे रस्ते, नाले इत्यादी बांधून आणि (ब) सर्वेक्षण विभागाकडून प्लॉटसची मोजणी ~~व~~ त्याचे सीमांकन करुन घेवुन ती जमीन विकसित करीत आणि अशा रितीने जमिन विकसीत होईपर्यंत ती व्यक्ती त्यामधील कोणत्याही प्लाटची कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावणार नाही.

५) परवानगी मिळालेल्या व्यक्तीने, असा प्लाट विकला किंवा त्याची अन्य प्रकारे विल्हेवाट लावली तर या आदेशामध्ये आणि सनदेमध्ये उल्लेखिलेल्या शर्तीस अधीन अशा प्लाटची विक्री किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट करणे तसेच ती जो विलेख तयार करुन देईल त्यामध्ये धासंबधीची उल्लेख करणे हे त्या व्यक्तीचे कर्तव्य असेल.

६) सोबत जोडलेल्या जागेच्या नकाशा मध्ये आणि/किंवा इमारतीच्या नकाशा मध्ये विनिर्दिष्ट केल्या प्रमाणे नियमानुसार चौरस मिटर जोत क्षेत्रफळावर इमारत बांधण्यात येईल आणि प्लाटचे बाकीचे नियमानुसार चौरस मीटर क्षेत्रफळाचे क्षेत्र हे मोकळे ठेवण्यात येईल या अटीवर ही परवानगी देण्यात येत आहे.

७) परवानगी मिळालेल्या व्यक्तीला अशा जमिनिवर कोणतीही प्रस्तावित इमारत बांधण्यास किंवा बांधकाम करण्यास प्रारंभ करण्यापुर्वी काम औरंगाबाद ~~ग्राम पंचायतीची /नगरपरिषदेची~~ महानगर पालिका आवश्यक ती इमारती विषयक परवानगी मिळवावी लागेल.

८) परवानगी मिळालेली व्यक्ती इमारतीचे नकाशे, ज्या प्राधिकाऱ्याकडे इमारत विषयक नियत्रंण विहित असेल त्या/सक्षम प्राधिकरणाची मान्यता मिळवील इतर प्रकरणामध्ये महाराष्ट्र जमिन महसुल (जमीनीच्या वापरात बदल व अकृषीक आकारणी) नियम १९६८ ला जोडलेल्या अनुसुची दोनमध्ये समाविष्ट असलेल्या तरतुदीनुसार काटेकोरपणे इमारतीचे नकाशे तयार करील आणि त्यासाठी औरंगाबाद च्या जिल्हाधीकाऱ्याची मान्यता मिळवील मंजुर नकाशा हुकुम इमारत बांधील.

९) परवानगी मिळालेली व्यक्ती राज्य/प्रमुख/जिल्हामार्ग इतर जिल्हा मार्ग गावातील मार्ग अशा रस्त्याच्या नियमानुसार रस्त्याच्या मध्यबिंदूपासून नियमानुसार फुट इतक्या अंतरात मोकळी जागा सोडील

Seal of the Jt. Sub-Registrar Aurangabad No.1
सत्यमेव जयते
अ ग ग-१
८३१० २८ ४५
२०२१

महाराष्ट्र जमीन महसुल (जमिनिच्या वापरातील बदल व अकृषिक आकारणी नियम १९६८ ला जोडलेल्या अनुसुची तीनमध्ये समाविष्ट असलेल्या तरतुदीनुसार नमुद करावयाचे.

१०) परवानगी मिळालेली व्यक्ती, अशा जमिनिच्या कृषीतर प्रयोजनासाठी वापर, वेळोवेळी मुदत वाढवली नसेल तर, या आदेशाच्या दिनांकापासुन एक वर्षाच्या कालावधीत * सुरु करील असे करण्यात कसुर झाली तर परवानगी रध्द झाल्याचे मानले जाईल.

११) परवानगी मिळालेली व्यक्ती जमिनिचा वापर कृषीतर प्रयोजनासाठी सुरु केल्याचा दिनांक आणि/किंवा जमिनिच्या वापरात बदल केल्याच्या दिनांक एक महिन्याच्या आंत तलाठ्यामार्फत आ २०११ बार तहसिलदाराला कळवील. असे करण्यात कसुर झाली तर, महाराष्ट्र जमीन महसुल (जमिनिच्या वापरातील बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६८ यांच्या नियम ६ च्या अनुसार ती व्यक्ती कार्यवाहीस पात्र ठरेल.

१२) परवानगी मिळालेली व्यक्ती, ज्या प्रयोजनासाठी परवानगी दिली आहे त्या कृषीतर प्रयोजनासाठी जमिनिचा वापर करण्यास प्रारंभ केल्याच्या दिनांकापासुन दर चौरस मिटरला रु ००-९५ पैसे या दराने त्या जमिनिच्या संबंधात कृषीतर आकारणी देईल जमिनिच्या वापरामध्ये कोणताही बदल झाल्यास पुर्वी लादलेल्या कृषीतर आकारणीच्या हमीचा दिलेला कालावधी संपलेला नसला तरीही अकृषिक आकारणी ही निराळ्या दराने करण्यात येईल.

१२(१) परवानगी मिळालेल्या व्यक्तीने कृषीतर आकारणीच्या तीन पट इतकी रक्कम रु ७२९०-०० (अक्षरी सात हजार दोनसे नव्वद रु इतका रुपांतरण कर हा आदेश काढल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसांच्या आंत भरला आहे, भरील असे करण्यात कसुर केलेली असेल तर, कृषीतर प्रयोजनाला दिलेली परवानगी रध्द केली जाण्यास पात्र ठरेल.

१३) कृषीतर आकारणीच्या हमीचा कालावधी ३१ जुलै १९९१ पर्यंत असेल त्यानंतर सुधारित दराने आकारणी करण्यात येईल.

Seal of the Sub-Registrar Aurangabad No.1 — सह दुय्यम निबंधक औरंगाबाद क्र. १ — सत्यमेव जयते

| अ ग ग - १ | | |
|---|---|---|
| ७३९० | २९ | ४५ |
| २०२१ | | |

(९)

१४) परवानगी मिळालेली व्यक्ती कृषीतर प्रयोजनासाठी जमिनिचा वापर [illegible] एक महिन्यांच्या आंत मोजणी फी देईल.

१५) या आदेशामध्यें आणि सनदेमध्ये उल्लेखिलेले क्षेत्रफळ व कृषीतर आकारणी ही [illegible] जमिनिची मोजणी केल्यानंतर प्रत्यक्ष आढळून येईल त्या क्षेत्रफळानुसार फेरबदल केली जाण्यास पात्र ठरेल.

१६) परवानगी मिळालेली व्यक्ती जमिनिचा कृषीतर वापर करण्यास प्रारंभ केल्यांच्या दिनाकापासुन तीन वर्षांच्या कालावधीत त्या जमिनिवर पक्की इमारत आणि किंवा इतर बांधकाम करील उक्त व्यक्तीने, शासकीय आदेशानुसार वसवता येईल असा दंड हप्ता दिल्यानंतर औरंगाबादच्या जिल्हाधिकारी यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार त्यास उक्त कालावधी वाढवता येईल.

१७) जिल्हाधिकारी औरंगाबाद नगर परिषद/ नगररचना विभाग (यथास्थिती) यांची पुर्व परवानगी घेतल्याखेरीज आणि त्या संबंधीचे नकाशे मंजुर करुन घेतल्याखेरीज मंजुर नकाशावर हुकुम अगोदरच बांधलेल्या इमारतीमध्ये कोणतेही जादा बांधकाम करणार नाही किंवा त्यात फेरफार करणार नाही.

१८) परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनिच्या अ वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६९ या सोबत जोडण्यात आलेल्या अनुसुची चार किंवा पांच मध्ये दिलेल्या नमुन्यात वस्तु सनद करुन देणे, तिच्यावर बंधनकारक असेल, अशा सनदे मध्ये या आदेशातील सर्व शर्तींचा समावेश करणे आवश्यक असेल. जमिनी च्या कृषीतर वापर करण्यास प्रारंभ केल्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या कालावधीत सनद करुन देणे बंधनकारक असेल.

अ ग ग-१
१३९७ | ३० | ४५
२०२१

१९(अ) परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तीने या आदेशामध्ये आणि सनदीमध्ये नमूद करण्यात आलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास, उक्त अधिनियमांच्या उपबंधान्वये उक्त व्यक्ती ज्या शास्तीस पात्र ठरेल त्या इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता जिल्हाधीकारी औरंगाबाद यांस निर्देश देतील तितका दंड व आकारणीची रक्कम भरल्यानंतर उक्त जमीन प्लॉट अर्जदारांच्या ताब्यात असणे चालु ठेवता येईल.

Seal of the Jt. Sub-Registrar Aurangabad No.
सह दुय्यम निबंधक औरंगाबाद क्र.
सत्यमेव जयते